# बृहन्मुंबई महानगरपालिका

No. A.E. /SWM/10226/S Dt. 17.11.2025

**विषय:** **'एस'** विभागातील मुख्य रस्ते एल.बी.एस मार्ग जे.व्ही.एल.आर. मार्ग व रेल्वे स्थानकातील परीसरातील रस्ते या ठिकाणी दुपार सत्रात (पिंक आर्मी) रस्ते स्वच्छता योजने अंतर्गत प्रायोगिक तत्वावर साफसफाईची सेवा सुरु करणेबाबत.

## स्वारस्य अभिव्यक्ती

उपरोक्त योजनेत रस्ते स्वच्छता योजने अंतर्गत सेवा सुरु करण्यासाठी यापुर्वी नियमित रस्ते स्वच्छता व मॅनिंग व मॉपिंग योजनेकरीता या कार्यालयामार्फत माहे. एप्रिल 2025 ते मार्च 2026 कालावधीत मनपा नियमानुसार वृत्तपत्रात जाहिरात देऊन मागविले होते. त्याद्वारे प्राप्त झालेल्या संस्थांच्या अर्जाची पडताळणीकरुन तयार करण्यात आलेल्या पात्रता यादीतुन रस्ते स्वच्छता/मॅनिंग व मॉपिंग योजनाकरीता माहे. ऑक्टोबर 2025 ते मार्च 2026 कालावधीत रस्ते स्वच्छता व मॅनिंग व मॉपिंग निवड झालेल्या संस्थांव्यतिरिक्त उर्वरित संस्थांपैकी ईच्छुक संस्थांकडुन अर्ज मागवुन लॉटरी पद्धतीने सोडत काढण्यात येईल.

| अनु.क्र. | कार्यरत योजना | निविदा छाननी शुल्क |
|---|---|---|
| 1 | \`एस\` विभागतील मुख्य रस्ते स्वच्छता योजना- पिंक आर्मी (दुपार सत्र) | 1300/- + 18 टक्के GST |

\`एस\` विभाग कार्यालयातील सहा. अभि. (घ.क.व्य.) खातेमार्फत उपरोक्त नमुद योजनावार निविदा रक्कम दि. 17.11.2025 ते दि. 24.11.2025 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत संस्थांकडुन अर्ज स्विकारुण निविदा छाननी शुल्क रोख स्वरुपात (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे चलणाद्वारे भरण्यात केल्यानंतर निविदा देण्यात येईल. सदर प्राप्त झालेल्या अर्जाच्या आधारे पात्रता यादी तयार करुन लॉटरी पद्धतीने संस्थांची निवड करण्यात येईल. यशस्वी ठरलेल्या संस्थांना योजनांच्या अटी व शर्तीनुसार स.मु.प./सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) कामाचे वाटप करतील. माहे ऑक्टोबर 2025 ते मार्च 2026 या कालावधीत रस्ते स्वच्छता/मॅनिंग व मॉपिंग योजने अंतर्गत कामाचे वाटप करण्यात आलेल्या संस्थांना नमुद कामासाठी सहभागी होता येणार नाही.

ईच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी सहा. अभि. (घ.क.व्य.)\`एस\` विभाग कार्यालयात संपर्क करावा. सुचनेमध्ये नमुद केलेल्या विहित कालावधीमध्येच फक्त अर्ज स्विकारले जातील तद्नंतर आलेल्या कोणत्याही अर्जाचा विचार करण्यात येणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सही/-

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) \`एस\` विभाग